# भाग्यरेखा

## स्वातंत्र्यपर्वातील 'पु.ल'.ची भाग्यरेखा




काळाच्या पडद्याआड कित्येक भाग्यवंताची 'भाग्यरेखाच' हरवलेली असते. अशीच एक 'भाग्यरेखा' गवसली आहे रूद्रा होम व्हिडीयोला.

ही 'भाग्यरेखा' काही साध्यासुध्याची नसून ती आहे महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्वाची पु.ल.देशपांडे यांची. आता तुम्ही म्हणाल पु.लं.चं एखाद दुर्मिळ पुस्तक सापडलं की काय? अहो पुस्तकाच काय घेऊन बसलात. चक्क नायिकेच्या भावाची भुमिका असलेला पु. लं. चा चित्रपटच सापडला आहे.पु.लं. नी भुमिका केलेला आणि अस्तित्वात असलेला हा पहिलाच चित्रपट. बाबूराव पेंढारकरांनी एक होतकरू व मेहनती अशी उपमा देऊन पु. लं. ना हा चित्रपट मिळावा म्हणून निर्माते टापरे बंधूंना गळ घातली आणि पु. लं. ना नायिकेच्या शांता आपटेच्या भावाची पेटंट भूमिका मिळाली.

शांताराम आठवले सारख्या ज्येष्ठ दिग्दर्शकाने 'भाग्यरेखाचे' दिग्दर्शन केले. नारायण हरी आपटे यांनी या चित्रपटाची गीते लिहिली तर केशवराव भोळेंसारख्या नावाजलेल्या संगीतकाराने या गीतांना साज चढवला.'देव खरा आधार' 'माझ्या माहेरी सुखाची सावली गं' आणि 'पाहिजे पोटाला भाकरी' ही तीन्ही गाणी शांताबाई आपटे यांनीच गायली आहेत.'पाहिजे पोटाला भाकरी' या गीताने जनसमुदायाला एक वेगळाच विचार प्रवाह दिला. स्वातंत्र प्राप्तीनंतर जेव्हा एक नवे राष्ट्र म्हणून भारत उदयाला येईल त्यानंतर पहिला प्रश्न असेल पोटाचा मग 'भाकरी हिच उदयाची क्रांतीप्रेरणा ठरेल'. असे सामाजिक विचार त्या काळी मांडले गेले.

'पाहिजे पोटाला भाकरी
नव्या युगाची नव्या जगाची हिच देवता खरी'

या गाण्याला तर लोकांनी अक्षरशः उचलून धरले होते. १९४७ ला भारत स्वतंत्र झाला तरी समाज प्रबोधन होणे आवश्यक होते त्यासाठी चित्रपट माध्यमातून समाज प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य करण्याचे ठरवूनच नारायण हरी आपटे यांनी 'भाग्यरेखाचे' कथानक लिहिले.'भाग्यरेखा' ची कथा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातली ज्यावेळी देशाचा बच्चा बच्चा स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झटत होता.त्यातच चित्रपटाची नायिका माणिकही. महात्मा गांधी आणि स्वामी आनंद यांच्या चळवळींनी प्रभावित झालेली माणिक निर्भयतेने जीवन जगू पाहते. यातूनच कथेचा विस्तार होत जातो. समाजाची बांधिलकी स्वातंत्र्यप्राप्ती तारूण्यसुलभ वेड मन आणि कौटुंबिक कर्तव्य यांतून माणिकची ध्येयनिश्चिती होत जाते.

माणिक ही एका सधन व उच्च कुळातील ब्राम्हण बाबूराव पेंढारकर यांची कन्या. तिचा कॉंग्रेस पक्षातून स्वातंत्र चळवळीत सहभाग असतो. माणिकला मार्गदर्शक असा 'मातृमंदीराच्या' स्थापनेच्या वेळी स्वामीआनंदकडून 'निर्भयतेने जग' असा संदेश मिळतो आणि मग खरोखरच तिच्यावर निर्भयतेने जगण्याची परिस्थिती येते. देवपण येण्यासाठी जसे दगडालाही टाकीचे घाव सोसावे लागतात अगदी तसेच माणिकच्या आयुष्यात घडत जाते. माणिकचे आयुष्य तिचे कुटूंब व त्यातील व्यक्तीरेखा आणि त्यांचे विचार हे चित्रपटात दाखविण्यात आले आहे. त्याकाळाच्या कितीतरी पुढे जावून सामाजिक व वैचारिक क्रांतीचे बीज चित्रपटाने रोवले.

आपण ज्यावर प्रेम करतो त्यासाठी सर्वस्व अर्पण करतांनाही आपल्याला कसलेच भय नसते. अशीच काहीशी परिस्थिती प्रभाकरवर प्रेम करताना माणिकची होत असते. त्या परिस्थितीत तिचा भूमिगतांशी प्रत्यक्ष संबंध येतो जो तिला संकटात ओढावून घेतो. या संकटातून ती ज्या पद्धतीने मार्ग काढते त्यातून तिच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आपल्यासमोर येतात. प्रभाकरकडून गर्भार राहिल्यानंतर जेव्हा ही गोष्ट सरला काकूंकरवी घरच्यांपर्यंत पोहचते तेंव्हा तर तीची सत्वपरीक्षाच होते. घरातील सर्व मोठी माणसे वडील़ भाऊ आजी यांजकडून तिला रूसवा सहन करावा लागतो पण आई मात्र तिच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. इतक्या कठीण परिस्थितीतही प्रभाकरला दिलेल्या वचनाची आठवण ठेवून त्याचे नाव प्रत्यक्ष वडीलांपुढे न येऊ देण्याची व त्यासाठी वाटेल ते कष्ट सोसण्याची माणिक जी तयारी दाखवते त्यावरून तिच्या ठायी स्वतःपेक्षाही देशाला मोठे मानण्याची वृत्ती दिसून येते.
हळूहळू नाटयमय पद्धतीने वडीलांना़ भावाला आणि आजीला त्यांची चूक लक्षात येऊन ते माणिकला स्विकारतात आणि माणिकलाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबियांना एक 'भाग्यरेखा' गवसते.



दिग्दर्शक : शांताराम आठवले.
संगीत : केशवराव भोळे.
गीते़ पटकथा व संवाद : नारायण हरी आपटे.
भूमिका : शांता आपटे
बाबूराव पेंढारकर
पु.ल.देशपांडे
सुधा आपटे
सरोज बोरकर
मधु आपटे.

भाग्यरेखा संग्रही ठेवण्यासाठी www.marathiworld.com/mwshop ला भेट द्या.
अथवा फोन खरेदीसाठी संपर्क नाशिक : 253 -2573197 मुंबई : 9820222776